औरंगाबाद येथील जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालयाकरीता “प्रशासकीय अधिकारी, गट-ब” यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः आसंअ-२०१७/ प्र.क्र.१३३/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : १३ मार्च, २०१८.

<u>वाचा</u>

१) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.मविका-२००८/प्र.क्र.२४१/०८/आरोग्य-४, दि.०२.०२.२००९.**

२) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.पदनि-२०१४/प्र.क्र.२९/आरोग्य-४, दि.२९.१२.२०१६.**

३) **सहसंचालक, आरोग्य सेवा रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/ कक्ष-३/ टे.३ अ/न.क्र.श्रेणी ११९/जि.रु.औ.आ.सं.अधि/३५०७४-७५/१७, दि.२३.११.२०१७.**

<u>प्रस्तावना</u>

आरोग्य संस्थांच्या बृहत आराखडयानुसार जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, औरंगाबादच्या स्थापनेस उपरोक्त क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. या २०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाकरीता उपरोक्त क्रमांक २ येथील शासन निर्णयान्वये २७९ अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदनिर्मिती करण्यात आली आहे. सदर जिल्हा रुग्णालयाचे व्यवस्थापन व आर्थिक बाबी हाताळण्यासाठी “प्रशासकीय अधिकारी, गट-ब” यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्याची बाब विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u>

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, जिल्हा औरंगाबाद रुग्णालयाचे व्यवस्थापन व आर्थिक बाबी हाताळण्यासाठी महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम क्र.१५६ मधील तरतूदीनुसार “प्रशासकीय अधिकारी, वर्ग-ब” यांना “आहरण व संवितरण अधिकारी” म्हणून घोषित करण्यास येत आहे.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.७३/१८/कोषा. प्रशा-५, दि.०१.०३.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०७१२५३३२५६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.13 12:56:15 +05'30'

प्र. मो. बलकवडे
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (औरंगाबाद मंडळ), औरंगाबाद.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
७. जिल्हा शल्य चिकित्सक, औरंगाबाद.
८. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
९. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०.कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
११.निवडनस्ती (आरोग्य-४).